# स्वीडनच्या शिष्टमंडळाची गावडेवाडीस भेट

मंचर, दि. ८ (प्रतिनिधी) - कुणीही कौतुक करावे असेच कार्य आदर्शगाव गावडेवाडी येथील महिलांचे आहे. त्यांच्या या कार्याचा आदर्श इतर महिलांनी घ्यावा, असे आवाहन स्वीडन देशाच्या प्रतिनिधी एडिटा व्होकराल यांनी गावडेवाडी, ता. आंबेगाव येथे केले.

महिला राजसत्ता आंदोलनाच्या वतीने आदर्शगाव गावडेवाडी येथे महिला गौरव सोहळा संपन्न झाला. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती व्होकराल बोलत होत्या. त्यांच्यासमवेत स्वीडनच्या प्रीटा लाला, रीटा सरिन, श्रीपना चौधरी, शरद सहकारी बँकेचे संचालक शंकर पिंपळे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर गावडे, सरपंच मीना गावडे, माजी सरपंच मनीषा गावडे, श्यामला मंडलिक, किरण गावडे, उपसरपंच सुरेश गावडे, ग्रामसेवक बी. बी. चव्हाण आदी मान्यवर हजर होते.

या कार्यक्रमाची सुरुवात हिरकणी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ईशस्तवनाने व स्वागतगीताने झाली. प्रास्ताविकात मनीषा गावडे म्हणाल्या, की गावडेवाडीत महिलांना ४५ टक्के आरक्षण असून, मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त असणे ही अभिमानाची बाब आहे. गावडेवाडी आदर्श गावाचा सार्‍या खेड्यांनी घ्यावा. याच कार्यक्रमात ग्रामपंचायत सदस्या योगिता गावडे, शशिकला पिंपळे, योगिता जारकड, सरपंच मीना गावडे, माजी सरपंच मनीषा गावडे यांचा कुटुंबासह सत्कार करण्यात आला. या वेळी ज्योती दहीतुले, सारिका गायकवाड, राणी शिंदे, तनुजा शिंदे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. एडिटा व्होकराल पुढे म्हणाल्या, की भारतातल्या या छोट्या खेड्याने केलेली नेत्रदीपक प्रगती आश्चर्यकारक असून, हे खेडे पाहून मी आनंदी झाले आहे. खर्‍या अर्थाने हे खेडे गौरवास पात्र आहे. दरम्यान, सरपंच मीना गावडे यांना व्होकराल यांच्या हस्ते भारताच्या राज्यघटनेची प्रत व छायाचित्र भेट म्हणून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनंदा मांदळे यांनी केले. शंकर पिंपळे यांनी आभार मानले.



*आदर्श गाव गावडेवाडी येथे शनिवारी स्वीडनच्या महिला शिष्टमंडळाने भेट दिली. त्या वेळी गावातून त्यांनी फेरी मारली. (छाया : जयेश शहा)*